महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस, ३ रा मजला,
शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०३६ संकेत स्थळ-www.mahakosh.in
फॅक्स क्रमांक ०२२-२२६२२०२९ ईमेल आयडी- aoexamdat.mum-mh@gov.in

---

क्रमांक : संलेको/प्रशिक्षण-उजळणी प्रशिक्षण/वर्ग ३/प्र.क्र.०७/यशदा/१२-२०१९/३०६ दिनांक - 24 DEC 2019

प्रति,

-------------------------

-------------------------

-------------------------

विषय : संचालनालय लेखा व कोषागारे कार्यालयाच्या अधिनस्त अधिकाऱ्यांसाठी नियोजीत तीन प्रशिक्षण कार्यक्रम **दि.३०/१२/२०१९ ते दि.३१/१२/२०१९, दि.३/१/२० ते ४/१/२०२० व दि.१३/१/२० ते १४/१/२०२०** नियोजीत जागा बदलबाबत.

संदर्भ : १ )संचालनालयाचे पत्र क्र. संलेको/प्रशिक्षण-उजळणी प्रशिक्षण/वर्ग१/प्र.क्र.०७/यशदा/११-२०१९/२७१व २७२, दि. ०२/१२/२०१९
२) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी यांचे पत्र क्र. लेखा/DAT/२०१९-२०/०४, दि. २४/१२/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुंषगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ अन्वये सन २०१९-२० या वित्तीय वर्षात संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांसाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे विविध लेखापरीक्षण अहवाल व विनियोजन लेखे यांचे स्पष्टीकरणात्मक ज्ञापने या विषयावर दि. ३०/१२/२०१९ ते ३१/१२/२०१९ , दि. ३/१/२०२० ते दि.४/१/२०२० व दि. १३/०१/२०२० ते १४/०१/२०२० असे २ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम नियोजीत आहे.

यशदामध्ये प्रशासकीय कारणास्तव निवासी व्यवस्था उपलब्ध होत नसल्यामुळे सदरचे प्रशिक्षणाच्या जागेमध्ये संदर्भ क्र. २ अन्वये पुढील प्रमाणे बदल केला आहे.

**Maharashtra State Institute of Hotel Management & Catering Technology (HMCT),**
**४१२ -C,K,M, Munshi Road, Laxmi Society,**
**Near Bharti Vidya Bhavan,**
**Model Colony, Senapati Bapat Road, Shivajinagar, Pune -४११ ०१६**

कृ.मा.प.

तसेच सदर संस्थेने निवासासाठी दि. ३०/१२/२०१९ ते ३१/१२/२०१९ व दि. १३/१/२०२० ते १४/१/२०२० या दिवशी जवळचे हॉटेल Lakme Executive- १२००/१ Ghole Road Near Tukaram Paduka Chowk, Fergusson College Road, Shivajinagar Pune -४११ ००४ येथे निवासाची व्यवस्था केलेली आहे.

तसेच हॉटेल व संस्था येथील जाणे येणे साठी बसची प्रशिक्षणाच्या वेळेनुसार स्वतंत्र व्यवस्था केली जाणार आहे. बसच्या नियोजित वेळेत प्रशिक्षणार्थींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रशिक्षणार्थींना स्वत:च्या जबाबदारीवर प्रशिक्षण केंद्रावर वेळेत उपस्थित राहणे आवश्यक राहिल.

दि. ३/१/२०२० ते ४/१/२०२० या कार्यक्रमाचे पूर्ण निवासी नियोजन हे MHSI Of Hotel Management & Catering Technology (HMCT), सेनापती बापट रोड पुणे येथे करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त जागा बदलल्याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**सोबत : सहपत्र**

(वि.मा.शिंगटे)
उपसंचालक (प्रशिक्षण),
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई